## नियमित दिवाणी दावा क्र.१२७/२०१५ मधील
## निशाण क्र.४० खालील आदेश

[ CNR No.MHKO090005242015 ]

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा याकरिता सादर केला आहे. सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रस्तूत दावेतील दावा मिळकतीचे जुने कागदपत्रे संबंधीत महसूल खात्याकडून उपलब्ध करून ती वकिलांना वेळेत देता न आलेने तसेच सदर प्रतिवादी या वयोवृध्द महिला असलेने त्यांना दाव्यास कैफियत सादर करणेस विलंब झाला. तरी प्रतिवादी क्र.२ ते ४ विरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत यावा.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादीमार्फत तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला. वादी यांनी असे कथन केले की, प्रस्तूत कामी त्यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे घेण्यात आलेला असून नि.२० ला साक्षीदार यांचा जबाब दाखल केला आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र.१ व सदर प्रतिवादी यांचे संगनमत झाले असून दावा लांबविणेसाठी हेतुपूर्वक सदर प्रतिवादी विलंब करत आहे, त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वाटप व कायम

मनाईकरिता दाखल केलेला आहे. मान्यत: कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे दिसते. तसेच वादीतर्फे पुरावा देखील सादर झाल्याचे दिसते. परंतू दावा वाटपाचा असलेने सर्व पक्षकारांचे म्हणणे विचारात घेणे संयुक्तिक ठरेल. झालेल्या विलंबास योग्य तो दंड आकारलेस न्यायसंगत ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.१०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक हजार मात्र) इतक्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम वादी यांना अदा करणेत यावी.

२) खर्चाची रक्कम अदा झालेनंतर प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचेविरुध्द झालेला विना–कैफियतचा आदेश रद्द करणेत येत असून त्यांची कैफियत स्विकारणेत येत आहे.

Digitally signed by NARENDRA
Date: 2024.11.13 16:43:23 +0530

स्थळ : गडहिंग्लज.
दिनांक : १३.११.२०२४.

( न. श्री. पुरी )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज